# अर्ज निशाणी क्रमांक २४ खालील आदेश

**( पारीत केलेला दिनांक १२.०७.२०२३)**

**०१**. प्रस्तूत अर्ज प्रतिवादींनी वादीचे पुराव्याचे शपथपत्र **नि.क्र.२०** वरील दिनांक **२४.०३.२०२३** रोजीचा **उलटतपास नाहीचा** आदेश रद्द करण्यास दाखल केला आहे.

**०२**. **प्रतिवादींचे असे कथन आहे की,** प्रतिवादींचे विधीज्ञ हे दुसऱ्या न्यायालयातील कामकाजात व्यस्त असल्यामुळे वादीचा उलटतपास घेण्यासाठी हजर राहू शकले नाही.

**०३**. वादीचे असे म्हणणे आहे की, वादी हा साक्षकामी सतत न्यायालयात हजर राहत असून प्रतिवादीने उलटतपास घेण्यास टाळाटाळ केली आहे. अर्जात दिलेले कारण संयुक्तीक नाही. वादीने तीव्र हरकत घेऊन अर्ज रद्द करण्याची विनंती केली.

**०४**. प्रतिवादींतर्फे विधीज्ञ **श्री. एस. सी. बिराजदार** आणि वादीतर्फे विधीज्ञ **श्री. ए. एस. मोरे** यांचा युक्तिवाद ऐकला.

**०५**. दावा स्थावर मिळकतीबाबत आहे. प्रतिवादींना वादीचा उलटतपास घेण्याची संधी नाकारल्यास त्यांचे नुकसान होईल. प्रतिवादींना उलटतपास घेण्याची संधी दिल्यास वादाचे कायमपणे निराकरण होण्यास मदत होईल. वादीचे त्यामुळे कोणतेही नुकसान संभवत नाही. प्रतिवादींनी त्याच दिवशी अर्ज दिला आहे.

**०६**. म्हणून प्रतिवादींविरुध्द वादीचे पुराव्याचे शपथपत्र **नि.क्र.२०** वर दिनांक **२४.०३.२०२३** रोजी वादीचा **उलटतपास नाहीचा** झालेला आदेश रद्द करणे उचित होईल. म्हणून खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**आदेश**

१. अर्ज **नि.क्र.२४** मंजूर करण्यात येतो.

२. वादीचे पुराव्याचे शपथपत्र **नि.क्र.२०** वर दिनांक **२४.०३.२०२३** रोजी प्रतिवादींविरुध्द **उलटतपासणी नाही** असा झालेला आदेश रद्द करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SUBHASH LAXMAN PHULE
Date: 2023.07.12 17:45:05 +0530

**(श्री. सुभाष ल. फुले.)**

**दिनांक :– १२.०७.२०२३.** **सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, औसा.**
**ठिकाण :– औसा.** **जिल्हा लातूर.**